# जपानी पुष्परचना - भाग २७




बांबूचे तुकडे वापरून मुक्तरचना केली आहे. जपानमध्ये थोड्या ऊबदार दमट हवेत सर्वत्र बांबू खूप सहजपणे वाढतो. त्यामुळे साहजिकच जपानी लोकांच्या वापरात बांबू सगळीकडे दिसतो. जपानी संस्कृती मधे बांबू हा शुभ मानला जातो. तसेच सुबत्तेचे प्रतीक मानला जातो.

जपानी 'चहापान' (tea ceremony) कार्यक्रमात वापरण्यात येणारी खोली, चहासाठी लागणारी भांडी सर्व बांबूचे बनविलेले असते. त्याचप्रमाणे इकेबाना रचना करताना काही महत्वाच्या अभिजात (classical) रचना बांबूच्या पुष्पपात्रामध्ये केल्या जातात. तसेच बांबूच्या पट्ट्यांपासून बनविलेल्या अतिशय सुंदर, कलात्मक टोपल्या वापरून सुध्दा रचना केल्या जातात.

वरील रचनेत भारतात मिळणाऱ्या बांबूच्या झाडाचे तुकडे वापरले आहेत. तिन्ही वेगवेगळ्या उंचीचे आहेत. लाल रंगाचे पोन्सेटिया आणि पांढरे जिप्सो (gypso) फिलर म्हणून वापरले आहे. पिवळ्या पानांनी एकमेकातील नाते / जोड (connection) दाखविले आहे. कामिनीची पाने लाल रंगाचा समतोल साधण्यासाठी वापरली आहेत. अगदी थोड्या फुलांत छोटीशी, नाजूक पण रंगामुळे लक्ष वेधून घेणारी रचना दिसते आहे.


**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**

व्हाईस प्रेसिडेंट इकेनोबो पुणे शाखा

asdssd@gmail.com

फोन नंबर 9881043456